**कृपया प्रसिध्दीसाठी** **८ सप्टेंबर २०११**

**तारापूर प्रकल्पपीडित मच्छिमारांना मच्छिमारीसाठी जमीन देण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश**

**मुंबई, गुरुवार** : तारापूर अणुऊर्जा प्रकल्पपीडित पोफरणच्या मच्छिमारांना मच्छिमारीसाठी समुद्रकिनारी आवश्यक ती जमीन देण्यात यावी असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ति श्रीमती रंजना देसाई आणि न्यायमूर्ति श्री. राजेश केतकर यांच्या खंडपीठाने आज दिला. तारापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या प्रकल्पपीडितांनी केलेल्या रीट याचिकेमध्ये प्रकल्पग्रस्तांच्यावतीने माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक आणि ॲड. सचिन पुंडे यांनी बाजू मांडली, तर महाराष्ट्र सरकारच्यावतीने ॲड. नितीन देशपांडे आणि न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशनतर्फे ॲड. राजेश कुमार आणि ॲड. एल्. ए. मुनीम यांनी बाजू मांडली.

या प्रकरणी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, ‘‘तारापूर अणुऊर्जा प्रकल्प ३ व ४ मधून १,०८० मेगावॅट विजेची निर्मिती सुरु होऊन ५ वर्षे पूर्ण झाली तरीही पोफरणच्या मच्छिमारांना समुद्रकाठची जमीन अद्याप देण्यात आलेली नाही. त्यांचे योग्य ते पुनर्वसन करु असे आश्‍वासन महाराष्ट्र सरकारचे ॲडव्होकेट जनरल श्री. थोरात यांनी उच्च न्यायालयात २८ फेब्रुवारी २००५ रोजी न्यायमूर्ति ए. पी. शहा आणि एस्. सी. धर्माधिकारी यांच्या खंडपीठाला दिले होते. तथापि त्याप्रमाणे कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. याशिवाय मी स्वत: पुढाकार घेऊन ठाणे जिल्हाधिकारी यांच्याशी या विषयावर २३ डिसेंबर २०१० रोजी चर्चा केली. चर्चेअंती मच्छिमार प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा भाग म्हणून उनभाट येथे बोटी लावण्यासाठी जमीन देण्याचे मान्य केले होते. त्या प्रकरणी निर्णयास विलंब होऊ नये म्हणून मी स्वत: मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना १४ डिसेंबर २०१०, १० फेब्रुवारी २०११ आणि ५ मार्च २०११ अशी तीन पत्रे लिहिली. तसेच ३० डिसेंबर २०१० रोजी प्रत्यक्ष भेटूनही चर्चेसाठी वेळ देण्याची विनंती केली. तथापि मुख्यमंत्र्यांनी चर्चेसाठी वेळ दिला नाही.’’

शासनाच्या संवेदनहीन वागणुकीविरुध्द श्री. राम नाईक यांनी आज उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर युक्तिवाद केला. न्यायमूर्ति श्रीमती रंजना देसाई यांनी निवासासाठी घरे दिली म्हणजे पुनर्वसनाचे काम पूर्ण होत नाही असे सांगून प्रकल्पपीडितांना त्यांचा मच्छिमारीचा व्यवसाय करण्यासाठी जमीन आणि आवश्यक त्या सुविधा दिल्या पाहिजेत असे सांगितले. महाराष्ट्र सरकारच्यावतीने ॲड. नितीन देशपांडे आणि न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशनच्यावतीने ॲड. राजेश कुमार यांचा युक्तिवाद झाल्यानंतर मच्छिमारांना जमीन देण्याबाबत जिल्हाधिका-यांनी केलेल्या पाहणीचा अहवाल न्यायालयाकडे सादर करावा तसेच सकारात्मक भूमिका घेऊन राज्य सरकारच्या पुनर्वसन सचिवांनी यासंबंधी प्रयत्न करुन प्रतिज्ञापत्र दाखल करावे असा आदेश खंडपीठाने दिला.

पुनर्वसनाच्या अन्य प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी पुढील सुनावणी २२ सप्टेंबर रोजी होणार आहे.

**(कार्यालय सचिव)**